महाराष्ट्र शासन

# क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य

शिवछत्रपती क्रीडा संकुल,महाळूंगे-बालेवाडी,पुणे-४११०४५.

संकेतस्थळ : **https://sports.maharashtra.gov.in** ई-मेल:**desk1.dsys-mh@gov.in**

## जाहिरात

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

संकेतस्थळ : **https://sports.maharashtra.gov.in** ई-मेल:**desk1.dsys-mh@gov.in**

जाहिरात क्रमांक: ०१/सन २०२३ दिनाक: १९जुलै, २०२३

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या नियंत्रणाखालील क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, यांच्या व अधिनस्त कार्यालयाच्या आस्थापनेवरील खाली नमुद केलेप्रमाणे एकूण १११ पदे सरळसेवेने भरण्याकरिता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

१. क्रीडा अधिकारी, गट ब (अराजपत्रित) ५९ पदे.
२. क्रीडा मार्गदर्शक, गट ब (अराजपत्रित) ५० पदे.
३. निम्नश्रेणी लघुलेखक, गट ब (अराजपत्रित)१ पद.
४. शिपाई, गट ड १ पद.

पात्र उमेदवारांकडून, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर फक्त ऑनलाईन पध्दतीने दिनांक २२ जुलै, २०२३ पासून दिनांक १० ऑगस्ट, २०२३ या कालावधीत अर्ज मागविण्यात येत आहेत. पात्र उमेदवारांनी या कालावधीत या संकेतस्थळावर वेब बेस्ड (Web-based) ऑनलाईन आवेदनपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणा दिनांक २२ जुलै, २०२३ पासून दिनांक १० ऑगस्ट, २०२३या कालावधीत करता येईल.

क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर परीक्षा विषयक माहिती, रिक्त पदाचा तपशील, आरक्षण व अर्हता तपशील आवेदनपत्र भरणे, परीक्षा शुल्क, अभ्यासक्रम, इ. माहिती जाहिरातीमध्ये सविस्तर देण्यात आलेली आहे.

**अधिक माहितीसाठी संकेतस्थळावरील "भरती/Recruitment" या टॅब वर भरतीसाठी लिंक व माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानुसार प्रथमतः माहिती डाऊनलोड करुन घ्यावी व सदर माहिती संपूर्णपणे वाचून उपलब्ध लिंकवर क्लिक करुन ऑनलाईन फॉर्म भरण्यात यावा.**

स्थळ:- पुणे
दिनांक: १९जुलै, २०२३

स्वा/-
डॉ. सुहास दिवसे
आयुक्त,
क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य.

| | | |
|---|---|---|
| | महाराष्ट्र शासन<br>**क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य**<br>शिवछत्रपती क्रीडा संकुल,महाळूंगे-बालेवाडी,पुणे-४११०४५. | |

संकेतस्थळ : **https://sports.maharashtra.gov.in**ई-मेल:**desk1.dsys-mh@gov.in**

जाहिरात क्रमांक: ०१/सन २०२३

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या नियत्रंणाखालील क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिनस्त कार्यालयाच्या आस्थापनेवरीलभूतपुर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील गट-ब (अराजपत्रित) सवंर्गातील क्रीडा अधिकारी-५९, क्रीडा मार्गदर्शक-५०, निम्नश्रेणी लघुलेखक-०१ व गट-डसंवर्गातील शिपाई-०१ (एकूण-१११) ही पदे सरळसेवेने भरण्याकरिता सदर पदांसाठी पात्र उमेदवारांकडून क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर फक्त ऑनलाईन पध्दतीने दिनांक **२२/०७/२०२३** पासून दिनांक **१०/०८/२०२३** या कालावधीत अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदांकरिता पात्र असणारे महाराष्ट्र राज्यातील तसेच शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन-क्र.मकसी-१००७/प्र.क्र.३६/का.३६, दिनांक १० जुलै, २००८ नुसार महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषिक उमेदवारही अर्ज करू शकतील. सदर पदांवरील भरती करिता ऑनलाईन परीक्षा महाराष्ट्रातील निश्चित केलेल्या विभागाच्या मुख्यालयाच्या **(मुंबई, नवी मुंबई, ठाणे,मुंबई महानगर क्षेत्र नाशिक, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद**(छत्रपती संभाजीनगर)**, लातूर, नागपूर व अमरावती)** ठिकाणी नेमून दिलेल्या केंद्रांवर घेण्यात येईल. ऑनलाईन परीक्षेची तारीख क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या संकेतस्थळावर यथावकाश प्रसिध्द करण्यात येईल.

२. क्रीडा व युवक संचालनालय व संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयाच्या आस्थापनेवरील क्रीडा अधिकारी-५९, क्रीडा मार्गदर्शक-५०, निम्नश्रेणी लघुलेखक-०१ व शिपाई-०१ (एकूण-१११) या रिक्त पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

२ . (अ) :- पदनाम :- क्रीडा अधिकारी,S-१४ (३८६००-१२२८००):-

| प्रवर्ग | अ.जाती | अ. जमाती | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | वि.मा. प्र | आ.दु. घ | इ.मा.व | एकुण आरक्षित | अराखीव (खुला) | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदे | ९ | २ | १ | -- | २ | २ | -- | ४ | ७ | २७ | ३२ | ५९ |
| सर्वसाधारण | ४ | १ | १ | -- | १ | १ | -- | २ | ३ | १३ | १० | २३ |
| महिला | ३ | १ | -- | -- | १ | १ | -- | १ | २ | ९ | ९ | १८ |
| माजी सैनिक | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | ३ | ५ | ८ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | २ |
| प्रकल्पग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | २ |
| भुकंपग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| पदवीधर अंशकालीन | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | २ | ३ | ५ |
| दिव्यांग | आरक्षण लागू नाही | | | | | | | | | | | |
| अनाथ | १ | | | | | | | | | | | |

२. (ब) :-पदनाम :- क्रीडा मार्गदर्शक, S-१४ (३८६००-१२२८००):-

| प्रवर्ग | अ.जाती | अ. जमाती | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | वि.मा. प्र | आ.दु. घ | इ.मा.व | एकुण आरक्षित | अराखीव (खुला) | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदे | ५ | १ | १ | १ | १ | १ | -- | ३ | १२ | २५ | २५ | ५० |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | १ | १ | १ | -- | २ | ३ | ११ | ७ | १८ |
| महिला | २ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | ४ | ७ | ८ | १५ |
| माजी सैनिक | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | ३ | ४ | ७ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | १ | २ |
| प्रकल्पग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | १ | २ |
| भुकंपग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| पदवीधर अंशकालीन | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | २ | ३ | ५ |
| दिव्यांग | आरक्षण लागू नाही | | | | | | | | | | | |
| अनाथ | १ | | | | | | | | | | | |

२. (क) :-पदनाम :- निम्नश्रेणी लघुलेखक, S-१४ (३८६००-१२२८००):-

| प्रवर्ग | अ.जाती | अ. जमाती | वि.जा. अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. ड | वि.मा. प्र | आ.दु. घ | इ.मा.व | एकुण आरक्षित | अराखीव (खुला) | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदे | -- | १ (आळी पाळीने) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ |
| सर्वसाधारण | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| माजी सैनिक | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| प्रकल्पग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| भुकंपग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| पदवीधर अंशकालीन | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| दिव्यांग | -- | | | | | | | | | | | |
| अनाथ | -- | | | | | | | | | | | |

२. (ड) :-पदनाम शिपाई,S-१ (१५०००-४७६००):-

| प्रवर्ग | अ.जाती | अ. जमाती | वि.जा .अ | भ.ज. ब | भ.ज .क | भ.ज. ड | वि.मा. प्र | आ.दु. घ | इ.मा.व | एकुण आरक्षित | अराखीव (खुला) | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण पदे | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ |
| सर्वसाधारण | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| माजी सैनिक | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| प्रकल्पग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| भुकंपग्रस्त | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| पदवीधर अंशकालीन | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| दिव्यांग | -- | | | | | | | | | | | |
| अनाथ | -- | | | | | | | | | | | |

३. प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या https://sports.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

४. **पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-**

४.१ भरावयाच्या उपरोक्त संवर्ग/पदांचा सामाजिक/ समांतर आरक्षणाबाबतचा तपशील शासनाच्या प्रचलित नियमानुसार आहे. तसेच, वर नमूद केलेल्या पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

४.२ पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास याबाबतची माहिती/ बदल वेळोवेळी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल व त्यानुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

४.३ विविध मागास प्रवर्ग, महिला, प्रावीण्य प्राप्त खेळाडू, अनाथ इत्यादींसाठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील.

४.४ महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यासअशा महिला उमेदवारांकडे महाराष्ट्राचे अधिवास (Domicile) प्रमाणपत्र आवश्यक आहे.

४.५ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्यावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

४.६ अर्ज करताना एखादी जात/जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवाराकडे उपलब्ध असेल तर संबंधित जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

४.७ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दि.१३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दि.१९ डिसेंबर, २०१८ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४.८ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि.१२ फेब्रुवारी, २०१९ व दि.३१ मे, २०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, सादर करणे आवश्यक राहील.

४.९ अद्यावत नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र/ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्राधिकाऱ्याने वितरित केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४.१० सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचा तपशील वेळोवेळी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

४.११ अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणाऱ्या सर्व उमदेवारांचा (मागासवर्गीय उमेदवारासह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचुकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

४.१२ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

४.१३ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणाऱ्या उमेदवाराकडे संबंधित कायदा/ नियम /आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे.

४.१४ सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

४.१५ परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अशंत: बदल करणे, पदांच्या एकूण् व प्रवर्गनिहाय पद संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

४.१६ **खेळाडू आरक्षण** :-

४.१६.१ शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.१ जुलै, २०१६, तसेच शासन शुध्दिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.१८ ऑगस्ट, २०१६, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दि.३० जून २०२२ आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्रावीण्य प्राप्त खेळाडू आरक्षणा संदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.१६.२ प्रावीण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्रावीण्य प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पुर्वीचे असणे बंधनकारक आहे.

४.१६.३ विहित दिनांकास खेळाचे प्रावीण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडूंना आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

४.१६.४ सक्षम क्रीडा प्राधिकरणाने निर्गमित केलेले क्रीडा प्रमाणपत्र सादर केले नसल्यास अथवा सदर प्राधिकरणाकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी केलेल्या अर्जाची पोचपावती सादर केली नसल्यास अर्ज नाकारण्यात येईल.

४.१६.५ प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकास पदाकरीता विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता उमेदवार प्रात्र ठरतो. याविषयी सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले विहित दिनांकास वैध असलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारशीकरीता विचार करण्यात येईल.

४.१६.६ एकापेक्षा जास्त खेळांची प्रावीण्य प्रमाणपत्र असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्रावीण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडे सादर करणे बंधनकारक आहे.

४.१७ **दिव्यांग आरक्षण** :-

४.१७.१ दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. दिव्यांग २०१८/ प्र.क्र.११४/१६ अ, दि.२९ मे , २०१९ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणा संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.१७.२ शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.संक्रीआ १०२१/प्र.क्र.६६/क्रीयुसे-२ दि. १८ नोव्हेंबर, २०२१ अन्वये क्रीडा अधिकारी व क्रीडा मार्गदर्शक या संवर्गाचे पद दिव्यांग पद सुनिश्चितीतून वगळण्यात आले आहे.

४.१७.३ निम्नश्रेणी लघुलेखक व शिपाई पदाच्या प्रवर्गात दिव्यांग आरक्षण अनुज्ञेय ठरत नाही.

४.१७.४ तथापि, दिव्यांग उमेदवार त्यांच्या त्यांच्या समाजिक आरक्षणा अंतर्गत अर्ज करु शकतात.

४.१७.५ **लेखनिक वापरणाऱ्या दिव्यांग उमेदवारांसाठी मार्गदर्शक सुचना**:-

दृष्टिहीन व ज्यांच्या लेखनाच्या गतीवरकायमस्वरूपी प्रतिकूल परिणाम झालेला आहे असे उमेदवार ऑनलाइन परीक्षेदरम्यान खालील **मुद्दा ४.१७.५.९ आणि ४.१७.५.१०** मध्ये नमुद मर्यादेच्या अधिन राहून लेखनिकाचा वापर करु शकतात. जेथे लेखनिक वापरला जातो अशा सर्व प्रकरणासांठीखालील नियम लागू होतील.

४.१७.५.१ उमेदवाराला त्याच्या/तिच्या स्वखर्चाने स्वतःच्या लेखनिकाची व्यवस्था करावी लागेल.

४.१७.५.२ उमेदवाराने निवडलेला लेखनिक हा त्याच परीक्षेसाठीचा उमेदवार नसावा. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वरील नियमांचे उल्लंघन आढळून आल्यास, उमेदवार आणि लेखनिक या दोघांचीही उमेदवारी रद्द केली जाईल. परीक्षेत लेखनिकाच्या सेवा पात्र व इच्छीत उमेदवारांनी ऑनलाइन अर्जामध्ये तसे नमुद करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्जामध्ये तसे नमूद नसल्यास नंतर लेखनिक वापरण्याची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

४.१७.५.३ लेखनिक म्हणून सेवा करणारी व्यक्ती एका पेक्षा जास्त उमेदवाराना लेखनिक म्हणून सेवा देऊ शकणार नाही. त्याबाबत उमेदवाराने आवश्यक ती काळजी घ्यावी.

४.१७.५.४ लेखनिक उपरोल्लिखित सर्व विहित अर्हतेच्या निकषांची पुर्तता करित असल्याचे योग्य हमीपत्र उमेदवार आणि लेखनिक दोघांनाही परिक्षा सुरू होण्यापुर्वी समवेक्षक/केंद्रप्रमुख यांच्याकडे द्यावे लागेल. तदनंतर जर उमेदवार किंवा लेखनिक विहित अर्हतेच्या निकषांची पुर्तता करित नसल्याचे आढळून आल्यास किंवा त्यांनी मुलभूत माहिती दडवली असल्याचे निष्पन्न झाल्यास निकालाची पर्वा न करताअर्जदाराची उमेदवारी रद्द केली जाईल.

४.१७.५.५ लेखनिक कोणत्याही शैक्षणिक शाखेतील असू शकतो. तथापि, क्रीडा मार्गदर्शक व क्रीडा अधिकारी या पदांसाठी विहित केलेल्या शैक्षणिक शाखेपेक्षा तो वेगळ्या शाखेचा असावा.

४.१७.५.६ जे उमेदवार लेखनिकाचा वापर करता त्यांना परीक्षेच्या प्रत्येक तासासाठी २० मिनिटे अतिरीक्त वेळ भरपाई म्हणून देण्यात येईल. परिक्षे दरम्यान लेखनिकाने स्वतःहून प्रश्नांची उत्तरे देऊ नयेत. असे कोणतेही वर्तन आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी रद्द केली जाईल.

४.१७.५.७ उमेदवारांना दिलेला भरपाईचा वेळ संगणक प्रणालीवर आधारित असल्याने ज्या उमेदवारांनी अर्ज करताना लेखनिकाची सेवा घेणार असल्याचे नमूद केले आहे अशा नोंदणीकृत उमेदवारांनाच अतिरक्त वेळ देण्यात येईल भरपाई वेळेसाठी नोंदणीकृत नसलेल्या अन्य उमेदवारांना अशा सवलतींना परवानगी दिली जाणार नाही.

४.१७.५.८ परीक्षेदरम्यान कोणत्याही टप्प्यावर लेखनिक स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे देत असल्याचे आढळल्यास,परीक्षा सत्र समाप्त केले जाईल आणि उमेदवारांची उमेदवारीही रद्द केली जाईल. परिक्षा संपन्न झाल्यानंतरही जर परिक्षे दरम्यान लेखनिकाच्या सेवांचा स्वतंत्रपणे प्रश्नाची उत्तरे देण्यासाठी वापर केल्याचे परिक्षा प्रशासनास आढळून आल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी देखील रद्द केली जाईल.

४.१७.५.९ **अस्थिव्यंग व मेंदूचा पक्षाघात असलेल्या उमेदवारासाठी मार्गदर्शक सूचना:-**

अस्थिव्यंग आणि मेंदूचा पक्षाघात (किमान ४०%दिव्यांगत्व) असलेल्या उमेदवारांनी आवेदन पत्रामध्ये तसे नमूद केले असल्यास त्यांना प्रति तास वीस मिनिटे अतिरीक्त वेळ दिला जाईल.

४.१७.५.१० **दृष्टिहीन उमेदवारांसाठी मार्गदर्शक सूचना:-**

दृष्टिहीन (ज्यांना ४०% पेक्षा जास्त दिंव्यागत्व आहे) उमेदवार परिक्षेसाठी मॅग्निफाइड फॉन्टची सुविधा उपलब्ध करण्याचा पर्याय घेऊ शकतात. तसेच अशा उमेदवाराना भरपाई म्हणून दर तासासाठी अतिरिक्त २० मिनिटे देण्यात येतील. जे उमेदवार परिक्षेसाठी लेखनिकाचा वापर करणार आहे त्या उमेदवारांना परिक्षेतील मजकूर मॅग्निफाइड फॉन्टमध्ये पाहण्याची सुविधा दृष्टीहीन उमेवारांना उपलब्ध होणार नाही.

४.१७.५.११. सदरची मार्गदर्शक सूचना केंद्र/ महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी जाहिर केलेल्या सूचना नुसार/निर्णयानुसार असून त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने बदल केल्यास ते बदल लागू राहतील.

### ४.१८ अनाथ आरक्षण :-

४.१८.१ अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक :अनाथ-२०१८/ प्र.क्र.१८२/का-३, दि.२३ ऑगस्ट, २०२१ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील.

४.१८.२ अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे ; त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

४.१८.३ प्रस्तुत पदासाठी अर्जाद्वारे अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी दि.२३ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार सुधारित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

### ४.१९ माजी सैनिकांकरीता आरक्षण :-

४.१९.१ उमेदवार स्वतः माजी सैनिक असल्यास त्याने त्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यास माजी सैनिकांना अनुज्ञेय असलेले लाभमिळणार नाहीत.

४.१९.२ माजी सैनिकांकरीता आरक्षणासंदर्भातील तरतुदी शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार असतील. दिव्यांग माजी सैनिक अर्ज करण्यासाठी पात्र आहेत.

४.१९.३ आवश्यक प्रमाणपत्र :-

(१) **सैनिकी सेवेतून मुक्त केल्याबाबतचे प्रमाणपत्र:-**

माजी सैनिकांसाठी असलेल्या वयोमर्यादा व आरक्षणाचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी विहित नमुन्यात सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(२) **जात प्रमाणपत्र व नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र:-**उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गामध्ये समाविष्ट होत असेल, त्या प्रवर्गासंबंधीचे जात प्रमाणपत्र तसेच वैध नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (लागू असल्यास) सादर करणे आवश्यक आहे. जाहीरातीमध्ये नमूद पदांकरिता नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणे अनिवार्य राहील.

### ४.२० प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण :-

शासन निर्णय ,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक: एईएम-१०८०/३५/१६-अ,दिनांक २१ जानेवारी,१९८० तसेच यासंदर्भात शासनाकडूनवेळोवेळी नमूद करण्यात येणा-या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

४.२१ भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण :-

शासन निर्णय ,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक: भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ,दिनांक २७ ऑगस्ट,२००९ व शासन निर्णय ,क्रमांक: विकाक २२१५/प्र.क्र३३७/१६-अ,दिनांक ०४ नोव्हेंबर,२००६ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

४.२२ पदवीधर अंशकालीन कर्मचारी आरक्षण :-

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक: पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दिनांक २७ ऑक्टोबर,२००९ व शासन निर्णय क्र.अशंका १९१८/प्र.क्र.५०७/१६-अ दि.०२ जानेवारी, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांसाठीचे आरक्षण राहील.

५. वेतनस्तर:-

| अ.क्र. | पदनाम | वेतनस्तर रुपये |
|---|---|---|
| १ | क्रीडा मार्गदर्शक | S-१४ (३८६००-१२२८००) अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते |
| २ | क्रीडा अधिकारी | S-१४ (३८६००-१२२८००) अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते |
| ३ | निम्नश्रेणी लघुलेखक | S-१४ (३८६००-१२२८००) अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते |
| ४ | शिपाई | S-१ (१५०००-४७६००) अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते |

६. पात्रता:-

६.१ भारतीय नागरिकत्व.

६.२ वयोमर्यादा :-

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | किमान अमागास / मागासवर्गीय/ आ.दु.घ | कमाल वय | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अराखीव (खुला) | मागासवर्गीय /आ.दु.घ./ अनाथ | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजदिष्ट अधिकारी | | दिव्यांग उमेदवार | पदवीधर अंशकालीन उमेदवार |
| | | | | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/ आ.दु.घ./ अनाथ | अराखीव (खुला) | मागासवर्गीय/ आ.दु.घ./ अनाथ | | |
| ०१ जून, २०२३ | १८ | ४० | ४५ | ४५ | ४५ | सैनिकी सेवेचा कालावधी अधिक ३ वर्षे | | ४५ | ५५ |

६.२.१ मागासवर्गीय उमेदवार, दिव्यांग आणि खेळाडू यांना असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेची सवलत यापैकी कोणतेही अधिकत्तम असलेली एकच सवलत देय राहील.

६.२.२ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सनिव २०२३/प्र.क्र.१४/कार्या-१२, दिनांक ०३ मार्च, २०२३ अनुसार कमाल वयोमर्यादेत ०२ वर्षे इतकी शिथिलता देण्यात आली आहे.

७. शैक्षणिक अर्हता आणि अनुभव:-

७.१ क्रीडा अधिकारी:-

(१)सांविधिक विद्यापीठाच्या कला/विज्ञान/वाणिज्य/विधी शाखेतील पदवीसह, मान्यताप्राप्त संस्थेची शारीरिक शिक्षण पदवी उत्तीर्ण.

किंवा

(२) नेताजी सुभाषचंद्र राष्ट्रीय क्रीडा संस्था, पतियाळा यांच्या कलकत्ता, बंगलोर व गांधीनगर विभागीय केंद्रानी किंवा तत्सम मान्यता प्राप्त संस्थानी घेतलेली क्रीडा क्षेत्रातील पदविका (मार्गदर्शक) उत्तीर्ण.

किंवा

(२) शारीरिक शिक्षण या मुख्य विषयासह शारीरिक शिक्षणाची पदवी (बी.पी.ई) परीक्षा उत्तीर्ण.

किंवा

(२) एखाद्या विशिष्ट खेळात राज्य/राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त.

७.२ क्रीडा मार्गदर्शक:-

(१)सांविधिक विद्यापीठाच्या कला/विज्ञान/वाणिज्य/विधी शाखेतील पदवीसह, मान्यताप्राप्त संस्थेची शारीरिक शिक्षण पदवी उत्तीर्ण.

किंवा

(२) नेताजी सुभाषचंद्र राष्ट्रीय क्रीडा संस्था, पतियाळा यांच्या कलकत्ता, बंगलोर व गांधीनगर विभागीय केंद्रानी किंवा तत्सम मान्यता प्राप्त संस्थानी घेतलेली क्रीडा क्षेत्रातील पदविका (मार्गदर्शक) उत्तीर्ण.

किंवा

(२) शारीरिक शिक्षण या मुख्य विषयासह शारीरिक शिक्षणाची पदवी (बी.पी.ई) परीक्षा उत्तीर्ण आहे.

किंवा

(२) एखाद्या विशिष्ट खेळात राज्य/राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त.

७.३ <u>निम्नश्रेणी लघुलेखक (मराठी)</u>:-

(१) माध्यामिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण.

(२) १०० श.प्र.मि. यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे लघुलेखनाचे आणि ४० श.प्र.मि. यापेक्षा कमी नाही. इतक्या गतीचे इंग्रजी टंक-लेखनाचे किंवा ३० श.प्र.मि. यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे मराठी टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र.

७.४ <u>शिपाई</u>:-

माध्यामिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण.

**७.५ शैक्षणिक अर्हता गणना करण्याचा दिनांक :- दिनांक ०१ जून २०२३.**

८. **कर्तव्य जबाबदाऱ्या**:-प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जाबाबदाऱ्या याबाबतचा तपशील क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

९. निवड प्रक्रिया:-

९.१ जाहिरातीमध्ये नमूद अर्हता/पात्रते विषयक अटी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

९.२ सेवा भरतीची संपुर्ण प्रक्रिया खालील सेवा प्रवेश नियम किंवा तदनंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणा तसेच तरतुदीनुसार राबविण्यात येईल :-

(१) समाज कल्याण, सांस्कृतीक कार्य व क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रीडा अधिकारी व क्रीडा मार्गदर्शक (सेवा प्रवेश नियम), २००१.

(२) सामान्य प्रशासन विभाग, निम्नश्रेणी लघुलेखक (सेवा प्रवेश नियम), १९९७.

(३) सामान्य प्रशासन विभाग, शिपाई (सेवा प्रवेश नियम), २०१७.

१०. निवडीची पद्धत : -

११.१. सर्व पदांसाठी फक्त मराठी माध्यमातून संगणक प्रणालीव्दारे ऑनलाईन परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात घेण्यात येईल. परीक्षा राज्यातील निश्चित केलेल्या जिल्हयाच्या मुख्यालयी घेण्यात येईल.

११.२ संगणक आधारीत परीक्षेव्दारे (Computer Based Online Examination) घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड केली जाईल. गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवाराने किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

११.३ संगणक आधारीत (Computer Based Examination) परीक्षेसाठी अभ्यासक्रम व इतर तपशील खालीलप्रमाणे राहील:

<table>
<tr><th>पदाचेनाव</th><th colspan="2">तपशिल</th></tr>
<tr><td>क्रीडा अधिकारी व शिपाई</td><td colspan="2">ऑनलाईन पध्दतीने परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात, प्रत्येक प्रश्नास एकूण (१०० प्रश्न) जास्तीत जास्त २ गुण.(२०० गुण) (शैक्षणिक पात्रतेस अनुसरुन मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी विषयावरील प्रश्नांकरिता प्रत्येकी-५० गुण) (परिक्षा कालावधी-१२० मिनटे)</td></tr>
<tr><td>क्रीडा मार्गदर्शक व निम्नश्रेणी लघुलेखक</td><td>ऑनलाईन पध्दतीने परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात, प्रत्येक प्रश्नास एकूण (६० प्रश्न) जास्तीत जास्त २ गुण (१२० गुण) (शैक्षणिक पात्रतेस अनुसरुन मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी विषयावरील प्रश्नांकरिता प्रत्येकी-३० गुण) (परिक्षा कालावधी-९० मिनटे)</td><td>८० गुणांची व्यावसायिक चाचणी संचालनालयामार्फत घेण्यात येईल.</td></tr>
</table>

११. अर्ज करण्याची पध्दत :-

**११.१ अर्ज सादर करण्याचे टप्पे**:-

**१२.१.१** प्रस्तुत परीक्षेसाठी फक्त ऑनलाइन पध्दतीने अर्ज स्वीकारण्यात येतील.

**१२.१.२** पात्र उमेदवाराला वेब आधारीत (web-based) ऑनलाईन अर्ज https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळाद्वारे दिनांक २२ जुलै,२०२३ ते दि.१० ऑगस्ट, २०२३ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

**१२.१.३** विहीत पध्दतीने अर्ज ऑनलाईन सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय परीक्षेसाठी उमेदवारी विचारात घेतली जाणार नाही.

११.२ **शुल्क (रुपये)** :-

**(एक)** अराखीव (खुला)- १०००/-

**(दोन)** मागासवर्गीय/ आर्थिक दुर्बल घटक/ अनाथ/ दिव्यांग- रुपये. ९००/-

(तीन) उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.

(चार) परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable)आहे.

१२. **ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना :-**

१२.१.१. उपरोक्त पदांच्या भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर मागविण्यात येत आहेत. पात्र उमेदवारांना या संकेतस्थळावर दिनांक २२ जुलै,२०२३ ते दि.१० ऑगस्ट, २०२३ या कालावधी मध्ये वेब बेस्ड (Web-Based) ऑनलाईन आवेदन पत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणा दिनांक २२ जुलै,२०२३ ते दि.१० ऑगस्ट, २०२३ या कालावधीमध्ये करता येईल.

१२.१.२ विहित पद्धतीने मुदतीत म्हणजेच दिनांक २२ जुलै,२०२३ ते दि.१० ऑगस्ट, २०२३ पर्यंत अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी शुल्क भरण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने रक्कम भरण्याची कार्यवाही दिनांक २२ जुलै,२०२३ रोजी सकाळी १२.०० वा. पासून दि.१० ऑगस्ट, २०२३ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेब लिंक बंद होईल.

१२.१.३ परीक्षा स्थगित व रद्द करणे, परीक्षेचे स्वरुप, परीक्षेची तारीख व ठिकाणात बदल करणे, पदसंख्या वाढ किंवा घट करण्याचे अधिकार क्रीडा व युवक सेवा संचालनालयास राहतील व संचालनालयाचा निर्णय अंतिम असेल, त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही. तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वा तक्रारी बाबत निर्णय घेण्याचा अधिकार राहील व संचालनालयाचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणत्याही पत्र व्यवहाराची दाखल घेतली जाणार नाही.

१२.१.४ उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी व पात्रता तपासूनच उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरावा.

१२.१.५ उमेदवारांची परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्व तपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. उमेदवाराना ऑनलाईन परीक्षेतील मिळालेल्या गुणांच्या आधारे तसेच त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिद्ध करून उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे सर्व अधिकार आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, हे राखून ठेवीत आहेत.

१२.१.६ परीक्षेच्या वेळी परीक्षा केंद्रात किंवा परीक्षा केंद्र परिसरात मोबाईल, गणकयंत्र (Calculator), आय पॅड वा तत्सम इलेक्ट्रॉनिक यंत्रे किंवा इतर संपर्काची साधने वापरण्यास सक्त मनाई आहे.

१२.१.७ उमेदवारास परीक्षा / कागदपत्रे पडताळणी इत्यादी करीता स्वखर्चाने यावे लागेल.

१२.१.८ ऑनलाईन परीक्षा स्थळामध्ये वाढ/बदल करण्याचे अधिकार विभागाकडे राहतील. परीक्षेचे ठिकाण, वेळ, दिनांक उक्त संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

१२.१.९ परीक्षेचे प्रवेशपत्र उक्त संकेतस्थळावरुन स्वत: डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची असेल. प्रवेशपत्र इतर कोणत्याही पद्धतीने पाठविले जाणार नाही.

१२.१.१० पात्र उमेदवारांचा अंतिम निकाल क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

१३. **उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्यापूर्वी लक्षात घेण्यासारखे महत्त्वाचे मुद्दे :-**

१३.१ ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी खालील प्रमाणे आवश्यक कागदपत्रे स्वाक्षरी इत्यादींचे / स्कॅन करून ठेवावे

१३.१.१ छायाचित्र (४.५ सें.मी. X ३.५ सें.मी. )

१३.१.२ स्वतःची स्वाक्षरी (काळ्या शाईने)

१३.१.३ स्वतःच्या डाव्या अंगठ्याचा ठसा (काळ्या किंवा निळ्या शाईच्या पांढऱ्या कागदावर)

१३.१.४ इंग्रजी भाषेतील खाली दिलेला मजकूर असलेले स्वहस्ताक्षरात लिहिलेले घोषणापत्र (पांढऱ्या कागदावर काळ्या शाईने)

१३.१.५ हे सर्व स्कॅन केलेले दस्तऐवज या जाहिरातीतील मुद्दा १२.३ मध्ये नमूद तपशिलाप्रमाणे आहेत याची खात्री उमेदवारांनी अर्ज भरण्यापूर्वी करावी.

१३.१.६ इंग्रजी भाषेतील मोठ्या अक्षरातील (Capital Letters )स्वाक्षरी स्वीकारली जाणार नाही.

१३.१.७ डाव्या अंगठ्याचा ठसा योग्य रित्या स्कॅन केलेला असावा आणि त्यावर डाग येऊ देऊ नये. (उमेदवारास डावा अंगठा नसल्यास असा उमेदवार अर्ज करण्यासाठी उजव्या अंगठ्याचा वापर करू शकतो.)

१३.२ हस्तलिखित घोषणेचा मजकूर खालीलप्रमाणे आहे :

Declaration

"I, (name of the candidate) hereby declare that all the information submitted by me in the application form is correct, true and valid. I will present the supporting documents as and when required."

(उमेदवाराची स्वाक्षरी)

१३.३ वर नमूद केलेले घोषणापत्र उमेदवाराने स्वहस्ताक्षरात आणि फक्त इंग्रजी भाषेत लिहिलेले असावे. घोषणापत्र इतर कोणत्याही भाषेत लिहिलेले आणि अपलोड केले असल्यास, त्या उमेदवाराचा अर्ज अवैध मानला जाईल. (दृष्टीहीन उमेदवारांच्या बाबतीत जे स्वहस्ते लिहू शकत नाहीत त्यांनी घोषणेचा मजकूर टाईप करून टाईप केलेल्या घोषणेच्या खाली डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा लावावा आणि तपशीलानुसार कागदपत्र अपलोड करावे.)

१३.४ ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणा करण्यासाठी आवश्यक सर्व माहिती व कागदपत्रे तयार ठेवावीत.

१३.५ उमेदवारांकडे स्वत:चा चालू स्थितीतील वैध वैयक्तिक ई-मेल आयडी आणि भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक असावा, स्वत:चा ई-मेल आयडी नसल्यास तो तयार करून घेण्यात यावा. वैयक्तिक ई-मेल आयडी आणि भ्रमणध्वनी क्रमांक सदरची भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चालू (सक्रिय) ठेवावा. नोंदणीकृत ई-मेल आयडीद्वारे परीक्षेसाठी प्रवेश पत्र डाउनलोड करण्यासाठी सूचना देण्यात येतील.

## १४. अर्ज भरण्याची कार्यपद्धती आणि सूचना :

१४.१.१ अर्ज नोंदणी –

१४.१.२ उमेदवाराला क्रीडा व युवक सेवा संचालनालायच्या https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर लॉगइन (Log in) करावे लागेल.

१४.१.३ उमेदवारांनी https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन "ऑनलाईन अर्ज करा" (APPLY ONLINE) या पर्यायावर क्लिक (Click) करा जे एक नवीन स्क्रीन उघडेल.

१४.१.४ अर्ज नोंदणी करण्यासाठी, "नवीन नोंदणीसाठी येथे क्लिक करा" (Click here for New Registration) टॅब निवडा आणि नाव, संपर्क तपशील आणि ई-मेल आयडी प्रविष्ट करा. प्रणालीद्वारे तात्पुरता नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड तयार केला जाईल आणि स्क्रीनवर प्रदर्शित केला जाईल. उमेदवाराने तात्पुरती नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड नोंदवावा. तात्पुरती नोंदणी क्रमांक (Registration Number) आणि पासवर्ड (Password) दर्शविणारा ई-मेल आणि एसएमएस देखील पाठविला जाईल.

१४.१.५ जर उमेदवार एकाच वेळी अर्ज भरू शकत नसेल, तर तो "जतन करा पुढे जा" (SAVE AND NEXT) टॅब निवडून आधीच प्रवेश केलेला डेटा जतन करू शकतो. ऑनलाईन अर्ज सबमिट करण्यापूर्वी उमेदवारांनी ऑनलाईन अर्जातील तपशीलांची पडताळणी करण्यासाठी व आवश्यक बदल करण्यासाठी "जतन करा पुढे जा" (SAVE AND NEXT) सुविधेचा वापर करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. दृष्टिहीन उमेदवारांनी अर्ज काळजीपूर्वक भरावा आणि अंतिमरित्या सादर करण्यापूर्वी ते योग्य असल्याची खात्री करण्यासाठी तपशीलांची पडताळणी करून घ्यावी.

१४.१.६ उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये तपशील काळजीपूर्वक भरावेत आणि त्याची पडताळणी स्वत: करावी. एकदा"पूर्ण नोंदणी बटणावर"(COMPLETE REGISTRATION BUTTON ) क्लिक केल्यानंतर अर्जामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

१४.१.७ उमेदवाराने स्वतःचे नाव, त्याचे/तिचे किंवा वडील /पती इ.चे नाव जसे प्रमाणपत्रे/गुणपत्रिका/ओळखपत्र पुराव्यामध्ये नमूद आहे त्याप्रमाणेच अर्जामध्ये नमूद करण्यात यावे. उमेदवाराच्या ओळखपत्र / पुराव्यामधील नाव व अर्जामध्ये नमूद केलेले नाव यामध्ये कोणताही बदल आढळल्यास उमेदवारी अपात्र ठरु शकते.

१४.१.८ उमेदवारांनी अर्जामध्ये नमूद केलेले तपशील सत्यापित (Validate) करून आपला अर्ज जतन करण्यासाठी Validate your details व Save and Next बटणावर क्लिक (Click) करून अर्ज जतन करावा.

१४.१.९ या सूचनांतील मुद्दा १४.३ मध्ये छायाचित्र आणि स्वाक्षरी स्कॅनिंग आणि अपलोड करण्याच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केलेल्या तपशीलानुसार उमेदवार त्यांचे फोटो व स्वाक्षरी अपलोड करू शकतील.

१४.१.१० उमेदवाराने त्यांचे इतर तपशील अर्जामध्ये नमूद करावेत.

१४.१.११ अर्जाच्या संपुर्ण नोंदणीपुर्वी अर्जदाराने आपल्या अर्जाचे पूर्वावलोकन आणि पडताळणी करण्यासाठी Preview बटणावर क्लिक करून अर्जाचे पूर्वावलोकन व पडताळणी करावी व भरलेले अर्ज, छायाचित्र, स्वाक्षरी आणि इतर तपशील बरोबर असल्याची पडताळणी आणि खात्री केल्यानंतरच ''COMPLETE REGISTRATION' ONLY /पूर्ण नोंदणी' वर क्लिक करा.

१४.१.१२ परीक्षा शुल्क भरणा करण्यासाठी (Payment) टॅबवर क्लिक (Click) करा आणि परीक्षा शुल्क भरण्यासाठी (Fees Payment) साठी पुढे जावे.

१४.१.१३ सादर (Submit) बटणावर क्लिक(Click) करा.

टीप : अ) USERNAME आणि PASSWORD जतन करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल.

ब) उमेदवारांने नोंदणी प्रक्रियेसाठी स्वत:चाच वैध/प्रमाणित ई-मेलआयडी वापरावा. अन्य व्यक्तींचा ई-मेल आयडी वापरु नये.

**१४.२ ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणे**:-

१४.२.१ ऑनलाईन अर्ज परीक्षा शुल्कासह भरण्याची सुविधा (payment gateway) उपलब्ध करण्यात आलेली आहे. त्यानुसार परीक्षा शुल्क भरण्याबाबत दिलेल्या सूचनांचे अनुसरण करुन परीक्षा शुल्क भरणा करण्यात यावा.

१४.२.२ परीक्षा शुल्क भरणा डेबिट कार्ड (RuPay/Visa/MasterCard/Maestro), क्रेडिट कार्ड, इंटरनेट बँकिंग, IMPS, कॅश कार्ड /मोबाइल वॉलेट वापरुन केले जाऊ शकते.

१४.२.३ ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने परीक्षा शुल्क भरल्या बाबतची माहिती सादर केल्यानंतर, कृपया सर्व्हरकडून प्रतिसाद मिळण्याची प्रतीक्षा करा. परीक्षा शुल्क पुनरावृत्ती टाळण्यासाठी मागे (Back)/ रिफ्रेश(Refresh) बटण (Key) दाबू नये.

१४.२.४ व्यवहार यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यावर, एक ई-पावती (E-Receipt) तयार होईल.

१४.२.५ 'ई-पावती' (E-Receipt) तयार न होणे परीक्षा शुल्क भरणा अयशस्वी झाल्याचे दर्शवते. Payment अयशस्वी झाल्यास, उमेदवारांनी त्यांचा तात्पुरता नोंदणी क्रमांक (Registration No) आणि पासवर्ड (Password) वापरुन पुन्हा लॉग इन करावे आणि Payment ची प्रक्रिया पुनश्चः पूर्ण करण्यात यावी.

१४.२.६ उमेदवारांनी परीक्षा शुल्क भरल्याची ई-पावती (E-Receipt) आणि फीचा तपशील असलेल्या ऑनलाईन अर्जाची मुद्रित प्रत (Printout) काढून घेणे आवश्यक आहे. ई-पावती व अर्जाची प्रत स्क्रीनवर न आल्यास ऑनलाईन व्यवहार यशस्वी झाला नसल्याचे दर्शविते.

१४.२.७ क्रेडिट कार्ड वापर कर्त्यांसाठी: - सर्व शुल्क भारतीय रुपयामध्ये सूचीबद्ध आहेत. तुम्ही गैर-भारतीय क्रेडिट कार्ड वापरत असल्यास, तुमची बँक प्रचलित विनिमय दरांवर आधारित तुमच्या स्थानिक चलनात रूपांतरित करेल.

१४.२.८ तुमच्या डेटाची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी, कृपया तुमचा व्यवहार पूर्ण झाल्यावर ब्राउझर विंडो (Browser window) बंद करा.

१४.२.९ फी भरल्याचा तपशील असलेल्या अर्जाची मुद्रीत प्रत (Printout) काढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

**१४.३ स्कॅनिंग आणि कागदपत्रे अपलोड करण्यासाठी मार्गदर्शक सूचना**:- ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी उमेदवाराकडे खाली दिलेल्या तपशिलानुसार त्याचे छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र यांची स्कॅन केलेली (डिजिटल) प्रतिमा असणे आवश्यक आहे.

१४.३.१ छायाचित्र प्रतिमा: (४.५ से.मी x ३.५ से.मी) :-

१४.३.१.१ छायाचित्र अलीकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचे रंगीत असणे आवश्यक आहे.

१४.३.१.२ सदरचे छायाचित्र रंगीत, हलक्या रंगाच्या विरुद्ध, शक्यतो पांढऱ्या पार्श्वभूमीवर घेतलेले आहे याची खात्री करा.

१४.३.१.३ कॅमेऱ्याकडे शांतपणे व स्थिर नजरेने पहावे.

१४.३.१.४ छायाचित्र सूर्यप्रकाशात काढलेले असेल तर आपल्या छायाचित्रावर सावली पडणार नाही याची दक्षता घ्यावी.

१४.३.१.५ तुम्हाला फ्लॅश वापरायचा असल्यास, "Red Eye" येणार नाही याची दक्षता घ्यावी.

१४.३.१.६ जर तुम्ही चष्मा घालत असाल तर त्यात कोणतेही प्रतिबिंब येणार नाही आणि तुमचे डोळे स्पष्टपणे दिसू शकतील याची खात्री करा.

१४.३.१.७ छायाचित्र काढतेवेळी टोपी, हॅट व गडद चष्मा घालू नये. धार्मिक पगडी (Headwear) वापरण्यास परवानगी आहे, परंतु त्याने तुमचा चेहरा झाकता कामा नये.

१४.३.१.८ परिमाण २०० x २३० पिक्सेल (प्राधान्याने).

१४.३.१.९ फाईलचा आकार २०kb - ५० kb दरम्यान असावा.

१४.३.१.१० स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार ५०kb पेक्षा जास्त नसल्याची खात्री करा. जर फाईलचा आकार ५० kb पेक्षा जास्त असेल, तर स्कॅनरची सेटिंग्ज समायोजित करा जसे की DPI रिझोलुशन, नंबर ऑफ कलर इ.

**१४.३.२ स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र प्रतिमा**:-

१४.३.२.१ अर्जदाराला पांढऱ्या कागदावर काळ्या शाईच्या पेनने स्वाक्षरी करावी लागेल.

१४.३.२.२ परिमाण १४० x ६० पिक्सेल (प्राधान्याने).

१४.३.२.३ फाईलचा आकार १०kb - २०kb दरम्यान असावा. स्कॅन केलेल्या प्रतिमेचा आकार २०kb पेक्षा जास्त नसल्याची खात्री करा.

१४.३.२.४ अर्जदाराने त्याच्या डाव्या अंगठ्याचा ठसा काळ्या किंवा निळ्या शाईने पांढऱ्या कागदावर लावावा.

१४.३.२.५ फाईल प्रकार: - jpg / jpeg

१४.३.२.६ परिमाणे:- २०० DPI मध्ये २४० x २४० पिक्सेल (आवश्यक गुणवत्तेसाठी प्राधान्य) म्हणजे ३ सेमी * ३ सेमी (रुंदी * उंची).

१४.३.२.७ फाईल आकार: २० KB - ५० KB

१४.३.२.८ अर्जदाराने पांढऱ्या कागदावर इंग्रजीत काळ्या शाईने स्पष्टपणे घोषणा लिहावी.

१४.३.२.९ फाईल प्रकार:- jpg / jpeg

१४.३.२.१० परिमाणे: - २०० DPI मध्ये ८०० x ४०० पिक्सेल (आवश्यक गुणवत्तेसाठी प्राधान्य) म्हणजे १० सेमी * ५ सेमी (रुंदी * उंची)

१४.३.२.११ फाईल आकार: - ५० KB - १०० KB

१४.३.२.१२ स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र अर्जदाराचे स्वतःचे असावे ,इतर कोणत्याही व्यक्तीचे नसावे.

१४.३.२.१३ परीक्षेच्या वेळी स्वाक्षरी केलेल्या उपस्थिती पत्रकावरील किंवा प्रवेश पत्रावरील अर्जदाराची स्वाक्षरी, अपलोड केलेल्या स्वाक्षरीशी जुळत नसल्यास, अर्जदारास अपात्र घोषित केले जाईल.

१४.३.२.१४ इंग्रजी मोठ्या अक्षरातील (Capital Letters) स्वाक्षरी / हस्तलिखित घोषणापत्र स्वीकारली जाणार नाही.

१४.३.३ **कागदपत्रे स्कॅन करणे**:

१४.३.३.१ स्कॅनर रिझोल्यूशन किमान २०० dpi (बिंदू प्रति इंच) वर सेट करा.

१४.३.३.२ रंग मूळ रंगावर सेट करा.

१४.३.३.३ वर नमूद केल्याप्रमाणे फाईलचा आकार असावा.

१४.३.३.४ स्कॅनरमधील प्रतिमा छायाचित्र/स्वाक्षरी/डाव्या अंगठ्याचा ठसा/हाताने लिहिलेल्या घोषणेच्या काठावर क्रॉप करा, नंतर प्रतिमा अंतिम आकारात क्रॉप करुन अपलोड करावी. (वर नमूद केल्याप्रमाणे).

१४.३.३.५ प्रतिमा फाईल JPG किंवा JPEG फॉरमॅटमध्ये असावी. उदा **:- image01.jpg** किंवा **image01.jpeg.** फोल्डर फायलीमध्ये सूचीबद्ध करुन किंवा फाईल प्रतिमा चिन्हावर माउस हलवून प्रतिमा परिमाण तपासले जाऊ शकते.

- MS Windows/MSOffice वापरणारे उमेदवार MS Paint किंवा MSOffice Picture Manager वापरुन .jpeg फॉरमॅटमध्ये कागदपत्रे सहज मिळवू शकतात. फाइल मेनूमधील-"Save As/सेव्ह ॲज" पर्याय वापरुन कोणत्याही फॉरमॅटमध्ये स्कॅन केलेले दस्तऐवज .jpg/.jpeg फॉरमॅटमध्ये जतन केले जाऊ शकतात. क्रॉप आणि नंतर आकार बदला पर्याय वापरुन आकार समायोजित केला जाऊ शकतो.

१४.३.४ **कागदपत्रे अपलोड करण्याची प्रक्रिया** -

१४.३.४.१ ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराला छायाचित्र, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र अपलोड करण्यासाठी स्वतंत्र लिंक प्रदान केल्या जातील.

१४.३.४.२ संबंधित लिंकवर क्लिक करा "छायाचित्र / स्वाक्षरी अपलोड करा / डाव्या अंगठ्याचा ठसा / स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र "अपलोड करा.

१४.३.४.३ स्कॅन केलेले छायाचित्र / स्वाक्षरी / डाव्या अंगठ्याचा ठसा / स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र फाईल सेव्ह केलेली जागा ब्राउझ करा आणि निवडा.

१४.३.४.४ त्यावर क्लिक करुन फाईल निवडा.

१४.३.४.५ ओपन/अपलोड वर क्लिक करा.

१४.३.४.६ फाईलचा आकार आणि स्वरुप निर्धारित केल्याप्रमाणे नसल्यास, एक त्रुटी संदेश प्रदर्शित केला जाईल.

१४.३.४.७ अपलोड केलेल्या प्रतिमेची गुणवत्ता पाहण्यास पूर्वावलोकन (Preview) मदत करेल. अस्पष्ट / डागाळलेल्या प्रतिमा असल्यास त्या जागी स्पष्ट प्रतिमा पुनश्चः अपलोड करता येतील.

१४.३.४.८ उमेदवाराने स्वतःचा फोटो, स्वाक्षरी, डाव्या अंगठ्याचा ठसा आणि विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र अपलोड केल्याशिवाय त्यांचा ऑनलाइन अर्ज नोंदणी होणार नाही.

**टीप** : -

१. छायाचित्रातील चेहरा किंवा स्वाक्षरी किंवा डाव्या अंगठ्याचा ठसा किंवा स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र अस्पष्ट असल्यास उमेदवाराचा अर्ज नाकारला जाऊ शकतो.

२. उमेदवाराने ऑनलाईन अर्जामध्ये छायाचित्र/स्वाक्षरी/डाव्या अंगठ्याचा ठसा/ स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र अपलोड केल्यानंतर उमेदवारांनी त्यांच्या प्रतिमा स्पष्ट आहेत आणि योग्यरित्या अपलोड केल्या आहेत हे तपासावे. छायाचित्र किंवा स्वाक्षरी किंवा डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा किंवा स्वहस्ताक्षरातील इंग्रजी भाषेतील घोषणापत्र ठळकपणे दृश्यमान नसल्यास, उमेदवार आपला अर्ज संपादित (Edit)करु शकतो आणि त्याचे छायाचित्र किंवा स्वाक्षरी किंवा डाव्या अंगठ्याचा ठसा किंवा हाताने लिहिलेली घोषणा फॉर्म सबमिट करण्यापूर्वी पुन्हा अपलोड करु शकतो.

३. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज करतेवेळी त्याचा फोटो व स्वाक्षरी ज्या ठिकाणी फोटो अपलोड करणे अपेक्षित आहे त्याच ठिकाणी अपलोड केले आहे याची खात्री करावी फोटोच्या जागी फोटो आणि स्वाक्षरीच्या जागी स्वाक्षरी अपलोड केलेली नसल्यास उमेदवाराला परीक्षेला बसू दिले जाणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची असेल.

४. उमेदवाराने अपलोड करावयाचा फोटो आवश्यक आकाराचाच आहे व त्यामध्ये उमेदवाराचा चेहरा स्पष्टपणे दिसत आहे हे सुनिश्चित केले पाहिजे.

५. उमेदवारांनी अपलोड केलेली स्वाक्षरी स्पष्टपणे दिसत असल्याची खात्री करावी.

६. ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर उमेदवारांनी त्यांच्या प्रणालीद्वारे तयार केलेल्या ऑनलाईन अर्जाची मुद्रीत प्रत (Print out) काढून घ्यावी.

१५. अर्ज करण्यासाठी इतर सूचना :

१५.१ उमेदवाराचे नाव, वडिलांचे/पतीचे नाव, आडनाव, आईचे नाव, जन्म दिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी, पत्रव्यवहाराचा पत्ता ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल.

१५.२ पत्ता नमूद करताना उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. (उदा. पत्रव्यवहाराचा पत्ता व कायमचा पत्ता किंवा दोन्ही.)

१५.३ त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी.

१५.४ ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी तसेच उमेदवाराने आधार क्रमांक/ आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती द्यावी.

१५.५ मराठी भाषेतील प्रावीण्य, MS-CIT प्रमाणपत्र (D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत C.C.C किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण मंडळ, मुंबई यांचे कडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र) या संबंधिची माहिती भरावी.

१५.६ एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केल्यानंतर अर्जदारास पुढे (Next) या बटणावर क्लिक करावे लागेल, त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदाराकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशील संपादित करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

१५.७ उमेदवारास अर्ज करावयाच्या पदाची निवड करावी लागेल.

१५.८ ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारखेस म्हणजे **दि.१० ऑगस्ट, २०२३** च्या रात्री २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर संकेतस्थळा वरील लिंक बंद होईल.

१५.९ जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉग-इन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची नव्याने केलेली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे परीक्षा प्रवेशपत्र, परीक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रक्रियांसाठी विचारात घेण्यात येईल, उमेदवारास ऑनलाईन अर्ज करताना कोणतीही शंका असल्यास त्याबाबत या https://cgrs.ibps.in/ हेल्पडेस्क लिंक (Helpdesk link) वर संपर्क साधता येईल.

१५.१० टिप : नोंदणी मधील तपशील जसे की वापरकर्ता नाव (USERNAME), ई-मेल आयडी, पसंतीचे स्थान, जन्म तारीख, उमेदवाराचे छायाचित्र (Photograph) आणि स्वाक्षरी इत्यादी आवेदन पत्र सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही.

**१५.११ अर्जातील माहितीचे पूर्वावलोकन :**

१५.११.१ युजरनेम आणि पासवर्ड वापरुन लॉग-इन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो.

१५.११.२ अर्ज प्रिंट करण्यासाठी "प्रिंट प्रिव्हयू" या पर्यायावर क्लिक करा.

नोंद : उमेदवाराने आपला PDF स्वरुपातील अर्ज, परीक्षा प्रवेशपत्र संपूर्ण भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्वतः जवळ जतन करुन ठेवणे अनिवार्य राहील.

**१६. परीक्षा केंद्र व परीक्षेबाबतच्या सर्वसाधारण सूचना:-**

१६.१ उमेदवारांना नेमून दिलेले परीक्षा केंद्र व त्याचा पत्ता प्रवेश पत्रात नमूद करण्यात येईल. संबंधित परीक्षा केंद्रावर ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेतली जाईल.

१६.२ उमेदवाराने एकदा केलेली परीक्षा केंद्राची निवड अंतिम असेल. परीक्षेचे केंद्र/स्थळ/तारीख/वेळ/ सत्र बदलण्याची कोणतीही विनंती कोणत्याही परिस्थिती मध्ये (वैद्यकीय किंवा इतर कारणांसाठी ) स्वीकारली जाणार नाही. उमेदवाराने त्याची प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी .

१६.३ उमेदवाराला त्याने/तिने निवडलेल्या केंद्राव्यतिरिक्त इतर कोणतेही केंद्र वाटप करण्याचा अधिकार क्रीडा व युवक सेवा संचालनालय स्वत: कडे राखून ठेवीत आहे.

१६.४ उमेदवाराने परीक्षा केंद्रावर स्वतःच्या जोखमीवर आणि स्वखर्चाने उपस्थित राहणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यास कोणताही प्रवास खर्च वा भत्ता दिला जाणार नाही किंवा उमेदवारास कोणत्याही स्वरुपाच्या इजा किंवा नुकसानीसाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालय जबाबदार राहणार नाही.

१६.५ उमेदवारांनी एखाद्या विशिष्ट परीक्षा केंद्राची पुरेशा संख्येने निवड केलेली नसल्यास किंवा एखाद्या केंद्राची निवड त्या केंद्राच्या उपलब्ध क्षमतेपेक्षा जास्त उमेदवारांनी केलेली असल्यास उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेसाठी इतर कोणतेही संलग्न केंद्र वाटप करण्याचा अधिकार क्रीडा व युवक सेवा संचालनालयास राहील.

१६.६ उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादी अशा कारणांसाठी) परत केले जाणार नाही.

**१७. अयोग्य वर्तन/अयोग्य माध्यमांचा वापर केल्याबद्दल दोषी आढळलेल्या उमेदवारांविरुद्ध कारवाई :-**

उमेदवारांना सूचित केले जाते की त्यांनी ऑनलाईन अर्ज सादर करताना कोणतेही खोटे, छेडछाड केलेले किंवा बनावट तपशील सादर करू नयेत आणि कोणतीही महत्त्वाची माहिती लपवू नये. परीक्षेच्या वेळी किंवा त्यानंतरच्या निवड प्रक्रियेत, उमेदवार खालील बाबतीत दोषी असल्यास किंवा आढळून आल्यास असा उमेदवार त्याविरुद्ध फौजदारी खटला भरणे यासोबतच ज्या परीक्षेसाठी तो उमेदवार आहे त्या परीक्षेसाठी अपात्र ठरविणे क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेसाठी कायमस्वरूपी किंवा विशिष्ट कालावधीसाठी अपात्र ठरविणे किंवा त्याच्या सेवा समाप्त करणे अश्या स्वरुपाची कार्यवाही करण्यात येईल.अयोग्य मार्गाचा अवलंब करणे,

१७.१ तोतयागिरी करणे किंवा कोणत्याही व्यक्तीद्वारे तोतयागिरी करून घेणे,

१७.२ परीक्षा हॉलमध्ये गैरवर्तन करणे किंवा चाचणीची सामग्री किंवा त्यातील इतर कोणतीही माहिती कोणत्याही स्वरुपात तोंडी किंवा लेखी , इलेक्ट्रॉनिक किंवा यांत्रिकरित्या कोणत्याही उद्देशाने उघड करणे, प्रकाशित करणे, पुनरुत्पादन करणे, प्रसारित करणे, संग्रहित करणे किंवा प्रसारित करणेसाठी सुलभ करणे.

१७.३ त्याच्या/तिच्या उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही अनियमित किंवा अयोग्य मार्गाचा अवलंब करणे, किंवा

१७.४ अयोग्य मार्गाने त्याच्या/तिच्या उमेदवारीसाठी समर्थन मिळवणे, किंवा

१७.५ परीक्षा/मुलाखत हॉलमध्ये मोबाईल फोन किंवा संवादाची तत्सम इलेक्ट्रॉनिक उपकरणे बाळगणे.

## १८. उमेदवारांसाठी महत्त्वाच्या सूचना:

१८.१ परीक्षा केंद्राचा पत्ता प्रवेश पत्रावर नमूद करण्यात येईल. परीक्षेचे केंद्र /स्थळ/ दिनांक /वेळ बदलाची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

१८.२ परीक्षा प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या वेळेनंतर परीक्षा केंद्रावर उपस्थित होणा-या उमेदवारांना परीक्षेला बसू देण्याची परवानगी दिली जाणार नाही. परीक्षेचा कालावधी जरी १२०/९० मिनिटाचा असेल तरी सुध्दा उमेदवाराना परीक्षा केंद्रावरील विहीत प्रक्रिया (उमेदवाराना महत्वाच्या सूचना देणे. उमेदवाराची व कागदपत्राची पडताळणी करणे, आवश्यक कागदपत्र जमा करणे लॉग इन करणे) पार पाडण्यासाठी उमेदवारांनी परीक्षा सुरु होण्यापूर्वी किमान १ तास परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे.

१८.३ उमेदवाराने अर्जामध्ये नमूद केलेली माहिती कोणत्याही टप्प्यावर चुकीची, अपूर्ण अथवा खोटी आढळून आल्यास उमेदवाराची संबंधित पदासाठीची उमेदवारी रद्द करण्यात येईल व संबंधित उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र राहील. चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास कोणतीही पूर्व सूचना/नोटीस अथवा कारण न देता उमेदवार तात्काळ सेवेतून काढून टाकण्यास पात्र राहील. त्यामुळे होणा-या सर्व परिणामास उमेदवार स्वत: जबाबदार राहील.

१८.४ **ओळख पटविणे-** परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे व उमेदवाराचा अलिकडील फोटो चिकटवलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड/पारपत्र/वाहनचालक परवाना/मतदार ओळखपत्र/फोटोसहित आधारकार्ड/बॅकेचे फोटो सहीतचे पासबुक/महाविद्यालयाचे/विद्यापीठाचे अलिकडील वैध ओळखपत्र /कर्मचारी ओळखपत्र/फोटोसहित असणारे बार कौन्सिलचे ओळखपत्र समवेक्षक/पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराची ओळख ही उमेदवाराचे प्रवेशपत्र हजेरीपत्रक/उपस्थितीपत्रक त्याने सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही.

१८.५ **रेशनकार्ड व तात्पुरता वाहन परवाना परीक्षेसाठी वैध ओळखीचा पुरावा म्हणून स्वीकारले जाणार नाही.**

टिप-उपरोक्त परीक्षेला उपस्थित रहातांना उमेदवाराने स्वत:ची ओळख पटविण्यासाठीची उपरोक्त नमूदपैकी आवश्यक ते मूळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायाकींत प्रती, परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही. उमेदवाराचे परीक्षेच्या प्रवेशपत्रावरील आणि सादर केलेल्या ओळखपत्रावरील नांव आवेदनपत्रात नोंदणी केल्यानुसार तंतोतंत जुळणे आवश्यक राहील. ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या मधल्या, शेवटच्या नावांत विवाहानंतर बदल झाला असल्यास त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबातचे राजपत्र/विवाह नोंदणी प्रमाणपत्र प्रतिज्ञापत्र यापैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. सर्व उमेदवारांनी खालील कागदपत्रासह ऑनलाईन परीक्षेला उपस्थित रहाणे आवश्यक आहे. खालीलपैकी कोणतेही कागदपत्र नसल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

१. परीक्षेसाठी वैध प्रवेशपत्र
२. मूळ फोटो ओळखपत्र
३. फोटो ओळखपत्राची छायाप्रत

१८.६ ऑनलाईन अर्जात भरलेल्या माहितीस उमेदवार स्वत: जबाबदार राहील त्यास क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे हे कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

## १९. इतर अटी :-

१९.१ परीक्षेच्या व्यवस्थापनामध्ये काही समस्या येण्याची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही. ज्यामुळे ऑनलाईन चाचणी वितरणावर तसेच निकालावर परिणाम होऊ शकतो. अशा वेळी या समस्यांचे निराकरण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. तथापि यामध्ये उमेदवारांची हालचाल, व परीक्षेला विलंब होणे यासारख्या बाबी गृहीत धरण्यात आलेल्या आहेत. परीक्षेचे फेर आयोजन हे विभागाच्या / परीक्षा आयोजित करणाऱ्या संस्थेच्या पूर्ण निर्णयावर अवलंबून राहील. परीक्षेच्या फेर आयोजनासाठी उमेदवारांचा कोणताही दावा राहणार नाही. चाचणी वितरणाची विलंबित प्रक्रिया न स्वीकारणारे, हालचालीस नकार देणारे किंवा अशा प्रक्रियेत सहभागी होण्यास इच्छुक नसलेले उमेदवार सरसकटपणे निवड प्रक्रियेतून बाद ठरविले जातील.

१९.२ परीक्षेशी संबंधित सर्व बाबींमध्ये क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचा निर्णय अंतिम असेल आणि तो उमेदवारावर बंधनकारक असेल. या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार किंवा वैयक्तिक चौकशी केली जाणार नाही.

१९.३ परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये घेतल्यास, विविध सत्रांमधील वापरल्या जाणाऱ्या चाचणीमधील अडचण पातळी विचारात घेऊन विविध सत्रांमधील गुण समायोजित करून समतुल्य करण्यात येतील. परीक्षा केंद्राची/ परीक्षा केंद्रावरील नोडची (Node) क्षमता कमी असल्यास किंवा कोणत्याही केंद्रावर किंवा कोणत्याही उमेदवारासाठी काही तांत्रिक व्यत्यय आल्यास अशा केंद्रावर एकापेक्षा जास्त सत्रे आयोजीत केली जाऊ शकतात.

१९.४ विभाग उमेदवारांच्या वैयक्तिक प्रतिसादांचे (उत्तरे) विश्लेषण इतर उमेदवारांच्या प्रतीसादांशी अचूक आणि चुकीच्या उत्तरांच्या समानतेचे नमुने शोधण्यासाठी करेल. यासंदर्भात विभागाद्वारे अवलंबलेल्या विश्लेषणात्मक प्रक्रियेत, उमेदवारांनी उत्तरे एकमेकांसोबत वाटप (Share) केलेली आहेत आणि त्यांना मिळालेले गुण खरे/वैध नाहीत असा निष्कर्ष निघाल्यास विभाग अशा उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवते तसेच अशा उमेदवारांचे निकाल रोखले जातील. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे किंवा उमेदवारांकडून निवड प्रक्रियेचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास उमेदवार निवड प्रक्रियेतून अपात्र ठरेल आणि त्याला/तिला यापुढे कोणत्याही निवड प्रक्रियेमध्ये भाग घेण्यास प्रतिबंध करण्यात येईल .

२०. **गुण पद्धती :- खालील पद्धतीचा अवलंब करून ऑनलाईन परीक्षेचे गुण ठरविले जातात:**

२०.१ वस्तुनिष्ठ चाचणीमध्ये प्रत्येक उमेदवाराने अचूक उत्तरे दिलेल्या प्रश्नांची संख्या अंतिम गुणांसाठी विचारात घेतले जातील.

२०.२ परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रांमध्ये घेण्यात आलेली असल्यास वरीलप्रमाणे उमेदवाराने संपादित केलेले अंतिम गुण विविध सत्रांमधील वापरल्या जाणाऱ्या चाचणीमधील अडचण पातळी विचारात घेऊन विविध सत्रांमधील गुण समायोजित करून समतुल्य करण्यात येतील.

२१. **निवडीचे निकष:** जाहिरातीत नमूद विविध पदांवरील नियुक्त्या या सदरच्या परीक्षेच्या आधारे तयार केलेल्या गुणवत्ता यादीच्या (Merit List) आधारे निवड करून, करण्यात येतील. परीक्षेद्वारे निवडीसाठी आवश्यक किमान गुण व परीक्षेमध्ये उमेदवारांना समान गुण मिळाल्यास गुणवत्ता यादीतील प्राधान्यक्रम शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि.४ मे, २०२२ मधील तरतुदीनुसार राहील.

२२. **उमेदवाराची गुणवत्ते नुसार निवड करण्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचेकडे सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांचा तपशील:**

२२.१ परीक्षेसाठी केलेल्या ऑनलाईन आवेदन पत्राची छायांकित प्रत.

२२.२ शैक्षणिक अर्हतेबाबतची कागदपत्रे

२२.३ संगणक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र

२२.४ परीक्षा शुल्क भरणा केलेल्या पावतीची प्रत.

२२.५ अर्जात नमूद केलेप्रमाणे जात प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र /नॉन क्रिमीलेअर/ इतर आवश्यक प्रमाणपत्र.

२३. **सेवाप्रवेशोत्तर शर्ती:-**

१. ज्या पदांकरिता प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहीत केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबधी केलेल्या नियमानुसार विभागीय/ व्यावसायिक परीक्षा.

२. हिंदी आणि मराठी भाषा परीक्षे संबधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यातून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

३. संगणकाच्या ज्ञाना संदर्भात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९ मार्च,२००३ तसेच शासन निर्णय माहिती तंत्रज्ञान विभाग (सा.प्र.वि.) विभाग क्रमांक मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९ दिनांक ४ फेब्रुवारी,२०१३ नुसार संगणक अर्हता प्राप्त करणे आवश्यक.

२४. सदर जाहिरात क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या https://sports.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

२५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षे संदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी संचालनालयाच्या https://sports.maharashtra.gov.in या सकेंतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करावे. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

२६. सदर जाहिरात क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**स्वाक्षरीत/-**

ठिकाण :- **पुणे**

**आयुक्त**

**क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य.**

*****

# क्रीडा अधिकारी/क्रीडा मार्गदर्शक/निम्नश्रेणी लघुलेखक व शिपाई या पदाच्या कर्तव्य जबाबदाऱ्या

| अ.क्र | पदनाम | कर्तव्य व जबाबदाऱ्या |
|---|---|---|
| १ | क्रीडा मार्गदर्शक | १. संबंधित खेळाचे प्रशिक्षण केंद्र विविध ठिकाणी स्थापन करणे व प्रशिक्षण केंद्रावर मार्गदर्शन करणे.<br>२. संबंधित खेळाचा जिल्ह्यामध्ये प्रचार व प्रसार करणे व खेळाच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे.<br>३. संबंधित खेळाच्या क्रीडा कार्यक्रमाचे आयोजन व नियोजनात सक्रीय सहभाग घेणे. संबंधित क्रीडा प्रशिक्षण केंद्राचा मासिक अहवाल पाठविणे.<br>४. जिल्ह्यामध्ये क्रीडा नैपुण्य चाचण्यांचे आयोजन करणे.<br>५. आवश्यक वेळी इतर क्रीडा स्पर्धा शिबिरे व क्रीडाविषयक उपक्रमात सहकार्य करणे.<br>६. जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी वेळोवेळी दिलेली पर्यवेक्षीय/प्रशासकीय कामे.<br>७. प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेणाऱ्या खेळाडूंचे दैनिक हजेरीपत्रक व मासिक प्रगतीदर्शक अहवाल नोंदवहीत नोंदवहीत नोंद करणे.<br>८. जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्राकरीता खरेदी करावयाच्या साहित्याबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी यांना मदत करणे.<br>९. शासन, आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, सहसंचालक, उपसंचालक इ. वरिष्ठ शासकीय अधिकारी यांनी निर्देशित केलेली इतर कामे. |
| २ | क्रीडा अधिकारी | १. आस्थापना व प्रशासकीय सुधारणा रचना व कार्यपध्दती व अन्य कार्यालयीन कामकाजात जिल्हा क्रीडा अधिकारी यांना सहाय्य करणे.<br>२. तालुका/जिल्हा/विभागीय/राज्य/राष्ट्रीय पातळीवरील शासनाच्या व इतर सर्व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यास सहाय्य करणे.<br>३. कार्यालयीन लेखे व अनुदान लेखे ठेवण्यास सहाय्य करणे.<br>४. उद्बोधन वर्ग/ उजळणी वर्ग/ सराव शिबीरे इत्यादी आयोजनाबाबत मदत करणे.<br>५. क्रीडा व युवक सेवा संबंधी विविध कार्यक्रमाचे आयोजन (उदा. युवक सप्ताह, युवक महोत्सव इ.) करण्याबाबत सहाय्य करणे.<br>६. संचालनालयातर्फे निर्देशित केलेल्या क्रीडा, शारीरिक शिक्षण व युवक कल्याण विषयक उपक्रमांचे आयोजन करणे.<br>७. शैक्षणिक संस्था, व्यायामशाळा, क्रीडा संस्था, युवक मंडळे/संस्था यांना अनुदान मंजूरीपूर्वी भेटी देवून तपासणी अहवाल जिल्हा क्रीडा अधिकारी यांना सादर करणे.<br>८. राष्ट्रीय सण, महोत्सव व राज्य महोत्सव यांचे आयोजनाबाबत (२६ जानेवारी, १५ ऑगस्ट इ.) सहाय्य करणे.<br>९. क्रीडा साहित्याची देखभाल, वाटप इ.विषयी सहाय्य करणे.<br>१०. जिल्हा वार्षीक योजनांतर्गत विविध योजनेकरीआता मासीक वितरण प्रणालीनुसार उपलब्ध होणा-या निधी प्रमाणे शासन निर्णयाच्या अधीन राहून प्राधान्यक्रमाने प्राप्त होणारे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे मंजुरीकरीता सादर करणे.<br>११. कार्यालयीन विविध नोंदवहया व माहितीचे संकलन, क्रीडा व युवक कल्याण विषयक सांख्यिकी माहिती गोळा करण्याविषयी सहाय्य करणे.<br>१२. अनुदानित संस्थेकडुन दिलेल्या अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र, काम पुर्णत्वाचा दाखला व लेखा विवरणपत्र प्राप्त करण्याकरीता पाठपुरावा करणे व प्राप्त झाल्यानंतर एकत्रित करून जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे सादर करणे. |

| अ.क्र | पदनाम | कर्तव्य व जबाबदाऱ्या |
|---|---|---|
| | | १३. क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत राबविल्या जाणा-या योजनांना प्रसिध्दी देण्याविषयी सहाय्य करणे.<br>१४. क्रीडा विषयक सुविधांच्या सुधारणा करण्याबाबत सहाय्य करणे.<br>१५. केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा अभ्यास करून त्याबाबतच्या अर्जाची छाननीसाठी सहाय्य करणे.<br>१६. केलेल्या कामाचा मासिक अहवाल जिल्हा क्रीडा अधिका-यांना सादर करणे.<br>१७. ज्या खेळांच्या स्पर्धा आयोजनाकरीता दिलेल्या असतील त्या खेळाच्या स्पर्धाचे पुर्वतयारी व यशस्वी आयोजन करणे.<br>१८. स्पर्धेतील विजयी झालेल्या खेळाडू/संघांना पुढील स्तरावरील स्पर्धेचे उपस्थितीपत्रक देणे व विजयी संघांचा प्रवेश अर्ज विहित कालावधीत पुढील स्पर्धा आयोजन करणा-या कार्यालयास कळविणे तसेच संबधीची खेळाडूंची प्रमाणपत्रे लिहणे, वितरीत करणे व नोंदी ठेवणे.<br>१९. विविध स्पर्धा आयोजनाकरीता घेण्यात आलेले अग्रीमाचा होशोब प्रमाणकासह जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे ०१ महिन्याच्या आत सादर करणे.<br>२०. एकविध खेळाच्या अधिकृत संघटनेव्दारा आयशेजित राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेबाबतचा संपूर्ण पत्रव्यवहार व अनुषंगिक सर्व कामे करणे.<br>२१. कर्मचा-यांची हालचाल नोंदवहीवर नियंत्रण ठेवणे.<br>२२. विधानसभा/विधानपरिषद तारांकित व अतारांकित प्रश्नांच्या अनुषंगाने काम करणे.<br>२३. वरिष्ठ शासकीय अधिकारी यांनी निर्देशित केलेली इतर कामे. |
| ३ | **निम्नश्रेणी लघुलेखक** | १. विविध बैठका, सुनावण्या व कार्यालयीन कामकाचे संदर्भात श्रुतलेखन घेणे व संगणकीय टंकलेखन करणे.<br>२. वरिष्ठ शासकीय अधिकारी यांनी निर्देशित केलेली इतर कामे. |
| ४ | **शिपाई** | १. कार्यालय उघडणे व बंद करणे.<br>२. कार्यालयाची साफसफाई करणे.<br>३. कार्यालयात शांतता राखण्यास मदत करणे.<br>४. कार्यालयातील नस्तींची ने-आण करणे.<br>५. वरिष्ठ शासकीय अधिकारी यांनी निर्देशित केलेली इतर कामे. |

******